# मराठवाडा मुक्ती संग्रामातील नांदेड जिल्हयातील महिलांचे योगदान

**मिलिंद बाबूराव थोरात**
सहाय्यक प्राध्यापक
भोगावती महाविद्यालय,कुरुकली
जिल्हा कोल्हापूर
मोबईल:-९८५०७७४८३०
mbthorat10@gmail.com

मराठवाड्याच्या स्वातंत्र्य लढयात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया देखील सहभागी झाल्या होत्या. मुक्तीसंग्रामात समाजातील सर्वच घटकांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या योगदान दिले. विद्यार्थी, तरूण, शेतकरी कामगार या लढयात सर्व ताकदीनिशी उतरले होते. स्वातंत्र्य लढ्याच्या दृष्टीने इ.स. १९३८ ते १९४८ ही वर्षे महत्वपूर्ण ठरली. १८४० ते १९०० हा काळ महाराष्ट्रातील सामाजिक दृष्टीने स्त्रियांच्या सुधारणेविषयी महत्वपूर्ण मानला जातो.१ इंग्रजी राजवटीने भारतात आधुनिक इंग्रजी शिक्षण, स्त्री शिक्षण, वारसाहक्क, विधवा विवाह, बालविवाह, स्त्री-पुरुष तुलना, संमती वय अशा अनेक प्रश्नावर लेखन झाले, चर्चा झाल्या, आंदोलने झाली. समाजात स्त्रियांची होणारी ससेहोलपट म. ज्योतीराव फुले, अण्णासाहेब कर्वे, पंडित रमाबाई, गोपाळ गणेश आगरकर, महिर्षी शिंदे सारख्या सुधारकांना सहन झाले नाही. त्यांनी स्त्री सुधारणेसाठी अव्याहत प्रयत्न केले. इंग्रजांच्या पुरोगामी राजवटीमुळे भारतीय स्त्रियांच्या जीवनात परिवर्तन होऊ लागले होते. चुल आणि मुल या कल्पनेतून स्त्रिया सामाजिक व धार्मिक जीवनात भाग घेण्यासाठी अल्प प्रमाणात का होईना धडपडू लागल्या होत्या. म. गांधीजीचा भारतीय राजकारणातील प्रवेश अनेक दृष्टीने वैशिष्टयपूर्ण ठरला. त्यांनी स्त्रियांना भारतीय राष्ट्रीय आंदोलनात येण्यास मोठे प्रोत्साहन दिले. स्त्रियांमध्ये असणारी सोशिकता,सहनशिलता,चिकाटी अफाट भासू लागली. हे गुण लक्षात घेऊन म. गांधीजींनी स्त्रीयांना सत्याग्रहात निदर्शने, सुतापासून खादी बनविणे अशा विधयक कामात सहभागी करून घेतले.२ म. गांधीजीच्या प्रेरणेने अनेक स्त्रिया राष्ट्रीय आंदोलनात उतरल्या. आवंतीकाबाई गोखले या महाराष्ट्रीय स्त्रीवर म. गांधीने दलित उद्धाराचे व स्त्री जागृतीचे काम सोपविले. स्त्री शक्तीच्या राष्ट्र कार्यासाठी उपयोग व्हावा म्हणून आवंतीकाबाईने मुंबई येथे २७ नोव्हेंबर १९४८ "हिंदू महिला" सभेची स्थापना केली. म. गांधीजीच्या विचाराने प्रभावीत होऊन अनेकांनी आपल्या कुटांबातील स्त्रियांना कॉंग्रेसच्या चळवळीत भाग घेण्यास परवानगी दिली.३ प्रेमा कंटक सारख्या महिलांनी अविवाहीत राहून स्वातंत्र्य लढयात कार्य केले.

महाराष्ट्रात राजकिय चळवळीत पती-पत्नी दोघेही सहभागी झाल्याची असंख्य उदाहरणे आहेत. द्वारकाबाई गुजरे, इंदिराबाई खांडेकर, राधाबाई ढमदेरे, यशोदाबाई भट या व अशा अनेक स्त्रियांनी समर्थपणे स्वातंत्र्य लढा लढविला.४ महाराष्ट्रात इंदुमती नाईक या स्त्रीने मुळशी सत्याग्रहात भाग घेतला. म. गांधीजींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत महाराष्ट्रातील हजारो स्त्रियांनी स्वतःला झोकून दिले. मोठया मिरवणूक काढल्या. दारूच्या दुकानावर निदर्शने केली. त्यापैकी अनेक जणीवर इंग्रजांनी खटले भरले. शिक्षा ठोठावल्या त्या त्यांनी भोगल्या. १९४२ साली सातारा जिल्हयात क्रांती सिंह नाना पाटील यांचे नेतृत्वाखाली पत्री सरकार स्थापन झाले. त्यात स्त्रियांनी आपला वाटा उचलला होता. त्यांच्या तुफानदल, या स्वयंसेवक संघटनेच्या स्त्री विभाग प्रमुख कॅप्टन लिला पाटील या होत्या. जळगाव स्टेशन जाळल्याच्या आरोपावरून त्यांना साडेसात वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. तुरुगांतून त्या फरार झाल्या भूमीगत कार्य करू लागल्या.५ पश्चिम महाराष्ट्रातील लढा हा अखिल भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यातच अंतर्भत होता. या लढयाचे भुभागाच्या दृष्टीने व्याप्ती हैद्राबाद मुक्ती संग्राम पेक्षा जास्त होती. तेथील सामाजिक शैक्षणिक व राजकिय वातावरण स्त्रियांच्या स्वातंत्र्य लढ्यातील सहभागास पोषक होते. कुटूंबातील स्त्रियांचे स्थान उंचावले होते. त्याचे कार्यक्षेत्र पारंपारिक कार्यक्षेत्राच्या मर्यादा ओलांडून पलीकडे गेलेले होते. घराच्या चार भिंतीआड कोंडून राहिलेल्या स्त्रिया सार्वजनिक राजकिय जीवनात उतरल्या त्यामुळे आंतरिक शक्ती इत्यादींना

पुढे येण्यास वाव मिळला.६ या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, ब्रिटिश व्याप्त भारतातील स्वातंत्र्याचा लढा सुसंस्कृत अशा ब्रिटिश सत्तेशी होता. ही राजसत्ता इंग्लंड मध्ये राहून हिंदुस्थानवर राज्य करीत होती. उच्च पदावर ब्रिटिश होते पण प्रत्यक्ष कारभार भारतीय प्रशासनातील लोक करीत होते. त्यामुळे ते स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या आपल्या बांधवावर शस्त्रे चालविण्यात नाखूश होते.७

हैद्राबाद संस्थानातील परिस्थिती पश्चिम महाराष्ट्रातील परिस्थिती पेक्षा भिन्न होती. निजामी राजवटीत जनतेवर जाचक बंधने होती. तेथील कायदे कानून वेगळे होते. वाहतूकीची साधने मागासलेली व अपूरी होती. त्यामुळे बाहेर काय घडत आहे हे सामान्यापर्यंत पोहचणे अवघड होते. पश्चिमात्य स्वातंत्र्यप्रिय सरंजामशाहीचे वारे निजामाने मराठवाड्यात येऊच दिले नाही. येथील शैक्षणिक, सामाजिक जीवन अत्यंत मागासलेले, बुरसटलेले व परंपरावादी हाते. निजाम व त्यांचे राज्य अजूनही मध्ययुगातील सरंजामशाहित होते. शिक्षण मानसास स्वातंत्र्यप्रिय बनविते, नवे विचार देते. लोकशाहीची जी बीजे जनतेच्या मनात रूजविटे, पण नेमके हेच निजामाला नको होते. म्हणून त्याने शिक्षणाकडे, मातृभाषेच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले.८ १९३० साली हैद्राबाद राज्यात साक्षरतेचे प्रमाण अवघे ५ टक्के इतके अल्प होते. स्त्री शिक्षणाचा विचार करता ते १/२ टक्के सुध्दा नव्हते. मुलींच्या शिक्षणाची अवस्था भयावह होती. मुली गोषातून शाळेत जात. खेडयात स्थिर फार भयानक होती. त्यांना शिक्षण मिळत नव्हते.९ स्त्रियांनी पुढे यावे, पुरोगामी जीवन पध्दती आत्मसात करावी यासाठी पोषक वातावरण संस्थानात नव्हते. सारे जीवन सनातनी परंपरागत आपल्या दारिद्रयाचे भान नसणारे मुस्लिम राजसत्तेमुळे पूर्ण लाचार झाले होते. कामाला गती नव्हती सर्व व्यवहार संथपणे होत. मुसलमान सत्ताधीश असल्याने शिक्षणाचे माध्यम शासकिय स्तरावर उर्दू असे. त्याच्या राहणीचा वेषभूषेचा भाषेचा प्रभाव सर्वावर पडलेला दिसून येईल. समाजात बाल विवाह रूढ होते. विधवा विवाहास मान्यता नव्हती. पुरूष बालविधवा कायदा घेत त्यामुळे भ्रण हत्या होत. सामान्य प्रशाषण सरंजामी व जातीय होते. पोलीस व सरकारी खात्यात मुसलमान अधिकारी असत. एखादया गुन्हयात कोनी तरूण तरूणी असली तर घराबाहेर येईल याची खात्री नव्हती. असेच बळजबरीने धर्मातर केले जाई. त्यामुळे खटल्याचे व गुन्हयाचे स्वरूप बदलत असे. मुसलमान गुंडाच्या वाटेला कोणी जात नव्हते कायदयाच्या बाबतीत अज्ञान होते. हिंदू समाज संघटीत नव्हता निजामाच्या कारभारावर टिका करण्याची सोय नव्हती. अशा सामाजिक जीवनात स्त्रियांची स्थिती काय असेल याचा विचार केला तर सर्वत्र अंधकारच दिसून येतो.१० मोठी कुटुंब संयुक्त असत. दोन-तीन पिढयाचे लोक एकत्र राहत. पडदा पध्दती होती. त्यामुळे स्त्रियांना बाहेर वावरणे शक्य नव्हते. लग्नाच्या वेळी उभ्याने पुढच्या दाराने घरात शिरण की मेल्यावर आडवसाने मागच्या दाराने बाहेर निघायचं. अशी स्त्रियांची स्थिती होती. स्त्रियांना स्वतंत्र व एकटे फिरता येत नसे. बाहेर कोठे जायचे असेल तर पडदे लावणे मागिल बाजूने स्त्रियांनी बसावे पुरुष पैकी कोन्हीतरी पुढील बाजूला टांगेवाल्याजवळ बसायचे. टांग्यात चढताना उतरताना टांगेवाल्याने पाठ करत उभे राहिले पाहिजे असा दंडक होता.११ अशा वातावरणात हैद्राबाद मुक्ती संग्रामात लहान मोठया कामात त्या सहभागी झाल्या त्यांचा सहभाग गुणात्मक दृष्टया अखिल भारतीय पातळीवरील स्त्रियांच्या सहभागाइतका तोलामोलाचा होता. पश्चिम महाराष्ट्रातील स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने खांदयाला खांदा भिडवून राष्ट्रीय / राजकीय लढयात येण्यासारखे होते. स्त्रियातील कर्तृत्वाला जागृत करणारी पुस्तके, वृतपत्रे नियतकालिके हरघडी त्यांच्या हातात पडत होती. आव्हान स्वीकारण्यासाठी लागणारे मानसिक व नैतिक बळ देणारा पुरुष वर्ग त्यांच्या पाठीशी उभा होता.१२ उलट हैद्राबाद संस्थानातील वातावरण स्त्रियाच्या विरोधी' होते. बुरसटलेली जुनी समाजरचना,धर्माध राज्यकर्ते त्यांच्या धर्माने घालून दिलेल्या आचारसंहितेविरूध्द वागणे हा अपराध असल्याने घराबाहेर स्त्री न येण्याची रूढी पाळत होते. स्त्रियांनी संग्रामात सक्रिय व्हावे किंवा नाही याबद्दल पुरुष वर्ग साशंक होता. तरीही अशा प्रतिकूल परिस्थितीतही महिला पुढे आल्या पुरूषांच्या बरोबरीने लढयात लहान मोठी कामे करू लागल्या.१३ हैद्राबाद संग्रामातील सेनापती आ.कृ. वाघमारे यांच्या पत्नी स्वातंत्र्यसंग्रामात पती बरोबर मोलाचे कार्य करू लागल्या. शस्त्रे गोळा करणे, वेश पालटून निरोप देणे, स्वातंत्र सैनिकांची गुप्तपणे व्यवस्था करणे, वेळप्रसंगी त्यांना जेऊ घालणे अशी कामे करीत असतानाच त्यांना तुरूंगात जावे लागले. श्रीमती आशाताई वाघमारे यांनी तुरुंगवास भोगला. स्वातंत्र्यानंतर त्या आमदार झाल्या, त्यांनी हरिजन सेवक संघाचे कार्य १० वर्ष केले. वयाची ८० वर्षे उलटून गेली तरी जनसेवेचे व्रत अखंडपणे आशाताईनी चालू ठेवले आहे.१४ आशाताई

प्रमाणे इतरही स्त्रिया या लढयात मोठ्या हिंमतीने उतरलेल्या दिसतात. सुशिलाबाई दिवान लताबाई, वैद्य, डॉ. जोत्स्नाबाई कुकडे, मालती देऊळगावकर या स्त्रियांचा लढयातील सहभाग महत्वपूर्ण होता. प्रत्यक्ष शत्रुबरोबर झार्शीच्या राणीसारख्या लढणाऱ्या दगडाबाई शेळके सारख्या स्त्रिया या लढयात होत्याच. दगडाबाई कधीही शाळेत गेल्या नाही तरीही तिच्या अंगी असणारी स्वातंत्र आकांक्षा आश्चर्यकारकच होती. भोकरदन तालुक्यातील पोलते टाकळीच्या भिकाजी पाटलाची लेक जन्मतः लढाऊ वृत्तीची होती.१५जालना जिल्हयातील धोपटेश्वर या गावातील देवराव शेळके यांच्याबरोबर दगडाबाईचा विवाह बालपणी झाला. विवाहानंतरही दगडाबाईंनी लढयात उडी घेतली म्हणून त्यांच्या पतीने दुसरा विवाह केला. वडिलांच्या घरीच नारायण गोसावी यांच्याकडून शस्त्रास्त्राचे शिक्षण त्यांनी घेतले. स्टेट कॉंग्रेसने लढा तीव्र केला. संस्थानाच्या सरहद्दीवर स्वातंत्र सैनिकांचे लढाऊ कॅम्प उघडले गेले. असाच एक कॅम्प कोलते टाकळी येथे सुरू झाला. या कॅम्पच्या सैनिकांनी रेल्वे मार्ग उखडणे, पोलीस चौक्यावर हल्ले करणे, शासकिय दप्तरे जाळणे, रजाकाराच्या छावण्यावर हातबॉम्ब टाकणे अशी कामे सुरू केली. दगडाबाई पेकोलते टाकळीच्या कॅम्प मध्ये दाखल झाल्या, त्यांनी सेवकांचा पोशाख धारण केला पुरुष सैनिकांबरोबर त्या वेगवेगळ्या ॲक्शनमध्ये त्यांनी रजाकारांनी पळवून नेलेल्या अनेक स्त्रियांची मुक्तता केली. दगडाबाई धोपटेश्वर गावच्या १५ वर्षे सरपंच होत्या, १० वर्षे पंचायत समिती व ५ वर्षे जिल्हा परिषद सभासद म्हणून त्यांनी कार्य केले.

हैद्राबाद स्वातंत्र संग्रामात नांदेड जिल्हयाचा सहभाग निर्णायक व महत्वपूर्ण स्वरूपाचा राहिला आहे. या लढ्यात पुरुष जसे आघाडीवर होते, नांदेड जिल्हयातील स्त्रिया सुध्दा लक्ष्यात पुरूषाच्या बरोबरीने वाटा उचलत होत्या.

**शंकुतलाबाई साले**

शंकुतलाबाई साले यांचा सहभाग महत्वपूर्ण होता. शंकुतलाबाईचा जन्म १९१४ च्या सुमारास उस्मानाबाद जिल्हयातील आंबेजवळगा या गावी झाला. त्यांचे वडील जनार्धन पंत कुळकर्णी पुरोगामी विचाराचे होते. वडिलांचा वारसा मुलीने उचलला त्या काळात जनार्धन पंतांनी आपल्या मुलीला पोहण्याची कला शिकविली होती. शंकुतलाबाईचे माहेर सधन होते.१६ शंकुतलाबाईना निसर्गाने सौंदर्य दिले होते. निष्कलंक चारित्र्य जपून त्यांनी स्वातंत्र संग्रामात पुरुषांच्या बरोबरीने धड़ाडीने कार्य केले. परभणी जिल्हयातील कळमनूरी तालुक्यातील जवळा पांचाळ या गावचा गोविंदराव साले यांच्या बरोबर शंकुतलाबाईचा विवाह झाला. साले कुटुंब अतिशय सुखी व श्रीमंतीचे जीवन जगत होते. शंकुतलाबाईला सामाजिक कार्याची आवड असल्याने त्यांच्या पतीने सामाजिक कार्य करण्यास मोकळीक दिली. आपल्याला ईश्वराने दिलेल्या संपत्तीचा आपण समाज कार्यासाठी उपयोग करावा असे शंकुतला बाईना वाटत असे. परभणी जिल्हयातील साले कुटूंबीयांचे नांदेड येथील बोधनकर घराण्याशी व्यवसायिक व कौटुंबिक संबंध होते त्यामुळ शंकुतलाबाईच्या घरच्यांनी नांदेड येथे घेऊन राहण्याचा निर्णय घेतला. १९४० ला बोधनकरांच्यामुळे साले कुटुंबिय नांदेड ला राहावयास आले.१७ नांदेड येथे बोधनकरांच्या घराशेजारी साले कुटुंबिय राहावयस गेले बोधनकर कुटुंबियांचा सहभाग व त्याचे मार्गदर्शन साले कुटुंबियांना मिळाले. बोधनकर कुटुबिय राजकिय व सामाजिक कार्यात कार्यरत होते. शंकुतलाबाई साले या कावेरीबाई बोधनकर बरोबर भूमिगतरित्या स्वातंत्र्य संग्रामात कार्य करू लागल्या. पत्रके व वस्त्र चोरून पुरवठा करित असताना पोलीसांनी त्यांना पकडले. चार दिवसांनंतर त्यांची जामिनीवर सुटका झाली.१८

नांदेड शहरात ९ ऑगस्ट १९४७ ला झेंडा प्रकरण घडून आले त्यादिवशी मुसलमानांची मोठी ईद होती. त्या दिवशी कॉंग्रेस कार्यालयासमोरून मुसलमानांची मोठी मिरवणूक जानार होती. नांदेड शहर कॉंग्रेसने कॉंग्रेस कार्यालयवर त्या दिवशी झेंडा उभारण्याचे ठरविले, कॉंग्रेसचे कार्यालय सराफा गल्लीतील बोधनकर यांच्या दुमजली इमारतीत हाते. नांदेडचे इत्तेहादुल मुस्लमीन व रजाकार संघटनेने कॉंग्रेसने मुसलमानांची ईद असल्याने त्यादिवशी कॉंग्रेस कार्यालयातील झेंडा उभारू नये अशी भूमिका घेतली. कॉंग्रेसने मात्र त्या दिवशी काहीही झाले तरी झेंडा उभारावयाच असा निर्णय घेतला. त्यामुळे वातावरण तप्त झाले. माथेफिरू मुसलमान रक्तपात घडवून आणण्याच्या धमक्या देऊ लागले दोन्ही बाजूने वातावरण तप्त झाले. बोधनकरांच्या घरांकडे लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊ लागल्या. क्षणात नांदेडचे वातावरण तप्त झाले व कोणत्याही क्षणी बोधनकराच्या घरात रजाकार शिरून महिलावर हात टाकतील अशी शंका निर्माण झाली अशा बिकट प्रसंगी शंकुतलाबाई साले या महिलेने धीराने आघाडी

सांभाळली. महिलेचे नैतिक धैर्य खचू दिले नाही. घरात घुसू पाहणाऱ्या रजाकाराचा मुकाबला करण्याची तयारी केली. इतर स्त्रियांची मदत घेतली व अतिशय धोक्याच्या वेळी धैर्य दाखविले.शंकुतलाबाई साले यांचे कार्य निजामी शासनाला जाचक होऊ लागले पण प्रत्यक्ष कार्यवाही करता येईलना म्हणून सुडबुध्दीने रजाकारांनी शंकुतलाबाईच्या सासरचा भव्य वाडा जाळून बेचिराख केला तरीही शंकुतलाबाईनी धीर सोडला नाही त्या स्वामी रामानंद तीर्थाच्या प्रत्येक कार्यक्रमाला हजर राहू लागल्या. खादी वापरणे, खादीचा प्रसार करणे, महिलांना शिकविणे, इत्यादी कार्य सुरू ठेवले व स्वतः मॅट्रिक पर्यतचे शिक्षण पूर्ण केले शंकुतला बाई व कावेरी बाईनी नांदेडमध्ये हनुमान टेकडीवर महिलांसाठी शाळा सुरू केली व अनाथ महिलांसाठी एक वसतिगृही सुरू केले. अशा प्रकारे शंकुतलाबाई साले या नांदेडमधील महिलेने हैद्राबाद मुक्ती लढयात योगदान दिले.१९

**कावेरीबाई बोधनकर**

नांदेड शहरात सरस्वतीबाई देशपांडे, शंकुतलाबाई साले व कावेरीबाई बोधनकर या स्त्री कार्यकत्यांचे त्रिकुट होते. कावेरीबाई या शामराव बोधनकराच्या धाकटया भगीनी होत्या. शामराव,बळवंतराव व जीवनराव हे तीन बोधनकर बंधू अक्षरशः सोन्या चांदीचा चमच्या घेऊन जन्माला आले. शामराव बोधनकर सांगतात की, सातशे एक्कर जमीन आमच्या मालकीची होती. सोने-चांदी कापड चोपड, वाडे कशाचीच कमतरता नव्हती. कपासीचा व्यापार तेजीत होती. घरात सावकारी होती. सराफेचे दुकान होते. तीघे बंधू कष्ट करून वडीलोपार्जीत संपत्तीत भर घालीत होते.२० १९१८ साली कावेरीबाईचा जन्म झाला त्या पाच वर्षाच्या असतांना त्यांच्या आईचे निधन झाले. कावेरीबाईचे बालपण आजोळी देगलूरला गेले. तेथे त्याकाळी मुलीची शाळा नसल्याने शिक्षणाची आबाळ झाली. कावेरीबाई बारा वर्षांच्या झाल्यावर मोठे भाऊ शामरावजी कावेरीबाई साठी वर शोधू लागले. नाशिकच्या काळारामंदिराचे पुजारी असलेल्या मुलाला कावेरीबाई दिली. नांदेडला धुमधडाक्याने थाटा माटात लग्न सोहळा पार पडला.पण कावेरीबाईच्या वराला घुरे येत होते. हे बोधनकरांना लग्नाच्या आधी कोणीही सांगितले नव्हते. गोदावरीत स्नान करीत असताना एक वर्षाच्या आतच कावेरीबाईच्या पतीचे निधन झाले त्या बाल विधवा झाल्या. परिस्थितीचे अवलोकन करून शामरावजीने आपल्या लहान भगीनीला माहेरी आणले. तिला शिकवून तिच्या पायावर उभे करावे व तिच्या आयुष्याला निश्चित हेतू द्यावा म्हणून नांदेडला शाळेत घातले. लवकरच कावेरीबाई चौथी पास झाल्या. त्यावेळी मराठवाडयात स्वातंत्र्य चळवळीचे वारे जोराने वाहू लागले. बोधनकराचे सारे कुटुंब स्वातंत्र्य आंदोलनात कार्यरत होते. वडिल भावाच्या संस्कारामुळे कावेरीबाई ही लढयात ओढल्या गेल्या. शामरावांना सराफे दुकानाच्या कामासाठी नेहमी मुंबईत जावे लागत. तेथील हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची चळवळ त्यांनी जवळून पाहिली. मराठवाडयाच्या स्वातंत्र्यासाठी आपण काहीतरी करावे असे वाटल्याने प्रथम ते खादी वापरू लागले. बोधनकराचे सर्व कुटुंबिय स्वातंत्र्य लढयात असल्याने त्यांच्यातील जाती भेदांच्या भिंती नष्ट झाल्या होत्या. त्यांच्या घरी स्पर्श अस्पृश्य सर्व प्रकारच्या कार्यकर्त्याचे येणे-जाणे राहाने जेवन करणे सर्वच चालू होते. कावेरीबाईही त्या कार्यात ओढल्या गेल्या. त्या स्वातंत्र्य संग्रामात कार्यरत असणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना निरोप देणे, शस्त्रास्त्र पुरविणे, महिलांची शिबीरे घेणे,नांदेड शहरातील महिलामध्ये स्वातंत्र्य लढयाविषयी जागृती करण्याचे कार्य त्यांनी सुरू केले. स्टेट कॉंग्रेसचा लढा तीव्र झाल्यावर महिलांच्या कामाचे स्वरूप बदलले. धाडसी स्वातंत्र्य सैनिक कार्यकर्ते भूमिगत झाले. त्यात शामराव बोधनकर व जीवनराव बोधनकर यांचा समावेश होता. बळवंतराव हे बार्शिला होते. निरोप देणे, चिठ्या पोहचविणे, शस्त्रे एका ठिकाणाहून दुसरीकडे नेणे, अशी व इतर कामे कावेरीबाई गुपचुप करू लागल्या. एखादयावेळी शस्त्रे साफ करण्याचे कार्यही त्या करीत.२१एकदा बार्शिहून काही शस्त्रे नांदेडला आनावयाची होती. वेश पालटून कावेरीबाई आपल्या मोहीमेवर निघाल्या पण बार्शिला पोहचण्यापूर्वीच पोलीसांना त्यांच्या कार्याचा सुगावा लागल्याने लातूर येथे त्या पकडल्या गेल्या व त्यांच्या समानात शस्त्रे सापडली ती पोलीसांनी जप्त केली. व दोन दिवसाची पोलीस कोठडी त्यांना दिली. त्यावेळी शामराव बोधनकर भूमिगत होते. कावेरीबाई बोधनकरांना दोन महिन्याची शिक्षा ठोठावण्यात आली. १९४८ साली स्टेट कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनी स्वातंत्र्याचा लढा तीव्र करण्याच्या दृष्टीने संस्थानातील वकिलांना कोर्टावर बहिष्कार घालण्याचे आव्हान केले. व वकिलांनी लढयाला सक्रीय पाठिंबा द्यावायासाठी नांदेड मध्ये महिलांनी प्रयत्न सुरू केले.ज्या वकिलांनी कोर्टावर बहिष्कार घातला नाही त्यांच्या घरी जावून निदर्शने करण्याचे काम कावेरीबाई बोधनकर शकुंतलाबाई साले या महिलांनी पार पाडले. त्यामुळे नांदेडमधील वकिलांनी कोर्टावर बहिष्कार घातला.

एकदा महत्वाची कागदपत्रे कावेरीबाई घरात लपून ठेवीत होत्या. आकस्मिकरित्या पोलीस आले व बोधनकरांच्या घराची झडती घेवू लागले. त्यावेळी धीराने कावेरीबाई पुढे आल्या व त्यांनी पोलीसांना स्पष्ट सांगितले की मी महिला आहे माझ्या खोलीची झडती पोलीस पुरुषांना घेवू देणार नाही. तुम्ही बळवंतरावाच्या घराची झडती घेण्यासाठी आला आहात ती घ्या व निघून जा. पोलीस निघून गेले कागदपत्रे व शस्त्रे कावेरीबाईच्या खोलीत सुरक्षित राहिली.२२ सरस्वतीबाई सरदेशपांडे

रस्वतीबाई सरदेशपांडे यानी पायाशी आलेली सर्व सुखे लाथाडून खडतर समाजसेवेचे वृत्त स्वीकारले. सरस्वतीबाईचा जन्म निझामबाद जिल्हयात नाळेश्वर या गावी २ फेब्रुवारी १९१८ साली झाला. सरस्वतीबाईंच्या वडिलांच्या घरी गजांत लक्ष्मी होती.२३ त्यांच्या आजोबाकडे गावाची देशमुखी होती. गोदावरी काठी बसलेल्या या गावची भरपूर जमीन त्यांच्या मालकीची होती. स्वतःचा चिरेबंदी चार बुरजाचा किल्यासारखा वाडा होता. पण त्यांच्या वडिलांनी मुलांच्या शिक्षणासाठी हैद्राबादेत बेगम पेठेत एक घर विकत घेतले. सरस्वतीबाई दोन बहिनी एक भाउ तेथे शिक्षणासाठी रहात. त्यांच्या घराच्या शेजारी वामनराव नाईक रहात होते व डाव्या बाजूला केशवराव पोरटकरांचा वाडा होता. पोरटकरांचा मुलगा परदेशी शिक्षण घेण्यासाठी गेला होता. आपल्या कुटुंबातूनही परदेशी जावून शिक्षण घ्यावे असे सरस्वतीबाईंना वाटू लागले. त्यांच्या वडिलांना पर्यटनाचा मोठा नाद होता. त्यांनी १२ जोतीलिंग व चार धाम यात्रा केली होती व सरस्वतीबाईच्या पदरी पुण्य बांधले होते.२४ त्या काळच्या रूढी परंपरेनुसार वयाच्या आठव्या वर्षी सरस्वतीबाईचा विवाह झाला त्यावेळी त्या केवळ दुसरी पास होत्या. त्याचे पती श्री दासोपंत सरदेशपांडे यांचे शिक्षण नववी पर्यंत झाले होते. सरस्वतीबाईचे लग्न गिरी बालाजीला खुप थाटामाटात पार पडले. सरदेशपांडे हे नांदेडमधील एक प्रतिष्टीत श्रीमंत घराण्यातील होते. सरस्वतीबाईना दोन दीर व दोन नंदा होत्या. एका तालेवर घराण्याची सुन असल्याने त्यांना बघण्यासाठी खुप उत्स्फूर्ता होती. लग्नानंतर पोटच्या पोरी प्रमाणे सासरे व सासू यांनी आपल्या सुनबाईचे लाड केले.नांदेडला सासरी असतांना घरी रांगोळ्या काढणे, चित्रे काढणे, चित्रे रंगविणे, गौरीच्यावेळी मनोवेधक सजावट करणे या कामात त्या दंग असत. पती दासराव वकिलीचे शिक्षण घेण्यासाठी हैद्राबादला गेले. दिर नंदा व सासू सारखे त्यांच्या बरोबर लहानग्या सुनबाई राहू लागल्या वयात आल्यावर आपल्या पतीचा सहभाग त्यांना हवासा वाटू लागला. व त्यांच्या पतीलाही त्यांचा विरह होवू लागला.सरस्वतीबाई आपल्या पतीच्या भेटीसाठी मधुनमधुन हैद्राबादला जात. भेट घेऊन परत नांदेडला येत पण काळाच्या उदरात वेगळेच घडत होते व नियतीची वेगळीच इच्छा होती. नांदेडला कावेरीबाई बोधनकर, शंकुतलाबाई साले यांच्या सारख्या ध्येयवादी व देशासाठी काहीतरी करण्याची तळमळ असणाऱ्या मैत्रिणी त्यांना भेटल्या त्या तिघांनी स्वामी रामानंद तीर्थ यांची भेट घेतली. त्या अगोदर हैद्राबादला महात्मा गांधीचे भाषण झाले, त्यात त्यांनी असे म्हटले होते की, पुरुषापेक्षा स्त्रिया जास्त कणखर असतात, सहनशील असतात व स्वार्थ त्यागाची भावना त्यांच्यामध्ये पुरुषापेक्षा जास्त असते. देशसेवेसाठी भारतीय स्त्रियांनी स्वतःला वाहून घ्यावे असा विचार त्यांनी मांडला. या महात्मा गांधीच्या विचाराचा प्रभाव सरस्वतीबाईवर पडला. त्यावेळी सरोजनी नायडू या हैद्राबादला आल्या असता राष्ट्र कार्यासाठी त्यांनी सुवर्णदानाची मागणी केली त्यावेळी मागचा पुढचा कुठलाही विचार न करता, सरस्वतीबाईनी आपल्या हातातील सोन्याची अंगठी सरोजनी नायडू यांना दान केली. या घटनेपासून सरस्वतीबाईच्या देशकार्याला सुरुवात झाली त्यांनी प्रथम स्त्रियामध्ये स्वातंत्र्यासंबंधी जागृती करण्याचे ठरविले. नांदेड येथील त्याचे घर मोठे होते. त्यामुळे घराच्या गच्चीवरही खुप मोठी मोकळी जागा होती. तेथे नांदेडमधील महिला एकत्र येऊ लागल्या, स्टेट काँग्रेसचा स्वातंत्र्याचा विचार समजावून घेऊ लागल्या. स्टेट कॉंग्रेसचे महिला सभासद करण्यासाठी त्या घरोघर हिंडू लागल्या. निजामाच्या सरंजामी राजवटी विरुध्द त्या गुप्तपणे लोकमत तयार करू लागल्या. गुप्तपत्रके तयार करून वाटणे स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्याचे काम राष्ट्रसेवादलाच्या महिलांच्या शाखा निर्माण करण्याचे काम त्या करू लागल्या.२५ राष्ट्रसेवादलाच्या शाखामधून महिलांना लाठी- काठीचे शिक्षण तसेच स्वसंरक्षणाचे शिक्षण दिले जाई.

**गंगूताई देव :**

गंगूबाई देव हया मुळच्या औंढा नागनाथ येथील दत्तात्र्य बंगाळे यांच्या सुकन्या. त्यांच्या आईचे नाव धृपदाबाई होते. औंढा येथील बंगाळे फुटुंबिय संयुक्तरित्या राहात. सखे चुलते मिळून दररोज २५ ते ३० माणसे एकत्र खात-पित. त्यांना पुरेशी शेती होती. घरात आर्थिक सुबत्ता होती पुजा अर्चा, सन-वार सारं काही यथासांग पार पडत होते.२६ दत्तात्र्य बंगाळे यांची अगोदरची

मुले बालपणीच मृत्यूमुखी पडली. म्हणून बंगाळे पती-पत्नींनी देवाला साकडे घातले. गंगामय्याला नवस केला. पवित्र गंगामय्या नवसाला पावली. त्यांच्या पोटी कन्या जन्माला आली. गंगामय्याच्या आशिर्वादाने घरात मुलगी जन्मली म्हणून मुलीचे नाव गंगा असे ठेवण्यात आले. त्या काळच्या प्रथेनुसार गंगाबाईचे शिक्षण घरीच झाले.२७ लग्नापूर्वी आक्षर ओळख झाली होती. गंगाबाई १२ वर्षाच्या झाल्या. त्यांच्या वडिलांना त्यांच्या विवाहाची काळजी लागली व गंगाबाईसाठी वर संशोधन सुरू झाले. त्याकाळी औंढयाचेच गोपाळशास्त्री देव हे नाशिकला वैद्यकिय शिक्षण घेत होते. पण त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती अतिशय गरीबीची होती. मुलगा डॉक्टर होऊन दवाखाना चालविल व आपला प्रपंच नेटका करील असा विचार करून बंगाळे कुटुंबियांनी गोपाळशास्त्री देवांना गंगूबाई दिली. वयाच्या १२ व्या वर्षी गंगुबाईचा विवाह गोपाळशास्त्री देवाबरोबर औंढा येथे थाटामाटात पार पडला. पण देवांच्या घरी गंगूबाईना देवू नये असे गंगूबाईच्या चुलत्याचे मत होते. पण शेवटी गोपाळशास्त्री देवाबरोबरच त्यांचा विवाह संपन्न झाला.२८ गोपाळशास्त्री देव नाशिकला वैद्यकिय शिक्षण घेत असतांना त्यांच्या मनात आपण देशाच्या स्वातंत्र्यासाठी काहीतरी केले पाहिजे असा विचार येवू लागला. नाशिकला असताना गोपाळशास्त्रीनी नांदेडच्या श्री. शामराव बोधनकरांचे नाव ऐकले होते. व त्याचे कार्यही त्यांच्या कानी आले होते. म्हणून गोपाळशास्त्रींनी शिक्षण संपल्यावर वैद्यकिय सेवा नांदेडला करायची व व तेथेच देशसेवा करण्याचा निर्णय घेतला. गोपाळशास्त्री देवांचे वैद्यकिय शिक्षण पूर्ण झाले व ते औंढयाला परत आले. आपली पत्नी गंगूताई व दिड वर्षाचा मुलाला घेवून ते नांदेडला येवून स्थायिक झाले. तेथे त्यांनी आपला दवाखाना थाटला त्यावेळी हैद्राबाद संस्थानात रजाकारांच्या अत्याचाराच्या विरोधात जनमत तयार झाले होते. गोपाळशास्त्रीनी भविष्यकाळात आपल्या पत्नीला कुटुबाचा भार सोसावा लागेल म्हणून तिने शिकून स्वावलंबी व्हावे यासाठी वर्धा येथील महिला आश्रमात एक वर्षाच्या शिक्षणासाठी पाठविले. गंगूताई एक वर्ष शिक्षण घेण्यासाठी आपल्या लहान मुलाला आते सासूच्या घरी ठेवून वर्ध्याला रवाना झाल्या. वर्धा येथे शिकत असतांना त्यांच्यावर राष्ट्रभक्तिचे संस्कार होवू लागले. गोपाळशास्त्रींच्या राष्ट्रवादी विचारांचा संस्कारही त्यांच्यावर झाला होता. वर्ध्याला आचार्य विनोबा भावे व महात्मा गांधींच्या स्वावलंबनाने त्या ध्येय प्रेरीत झाल्या होत्या. सुत कताई, खादी विनने, खादी वापरने, प्रार्थना म्हणने, स्वत:ची कामे स्वतः करणे या गोष्टी त्या शिकल्या व गांधीजींचे संस्कार घेवून त्या नांदेडला आल्या. स्वातंत्र्य विचाराने पेटलेली देव पती-पत्नी सहजपने मुक्ती संग्रामात ओढली गेली. गोविंद भाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, स्वामीजी यांच्या सभाना गंगूताई हजर राहू लागल्या. त्यांचे पती अगोदर पासूनच स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले होते. व्यक्तीगत सुख दुःखाचा विचार न करता निष्ठेने स्टेट कॉंग्रेसचे काम त्या करू लागल्या.

१९४७ साली हैद्राबाद मुक्ती आंदोलनाची व्याप्ती वाढत गेली. लढा तीव्र बनत गेला. नांदेड जिल्हयाचा सशस्त्र स्वातंत्र्य सैनिकांचा कॅम्प उमरखेड जिल्हा यवतमाळ येथे सुरू झाला. या केंद्राचे प्रमुख म्हणून गोपाळशास्त्री देव, भगवानराव गांजवे व शामराव बोधनकर हे नेते काही काळ होते. गोपाळशास्त्री उमरखेड कॅम्पवर काम करीत आहे ही बातमी गंगूबाईना कळली व त्याही उमरखेड कॅम्पमध्ये सामील झाल्या. उमरखेड कॅम्पच्या सैनिकाचे स्वयंपाक करण्याचे काम त्या स्वतः करू लागल्या.२९ उमरखेड कॅम्पवर सुमारे ५० ते ६० स्वातंत्र्य सैनिक राहात असत त्या सर्वाचा स्वयंपाक करण्याची व त्यांना जेवू घालण्याचे काम ६ महिने पर्यंत गंगूबाईंनी केले. कॅम्प मध्ये भूमिगत कार्यकर्ता रात्री-बेरात्री वेष पालटून येत असत. परवलीचा शब्द सांगत लगेच गंगूताई त्याला जेवनाचे ताट वाढवित. जेवण झाल्यानंतर कार्यकर्ता ठरल्या कार्यक्रमास निघून जात असे. गंगूबाई महत्वाचे निरोप गुप्तपणे देणयाचे काम व गुप्त शस्त्रास्त्रे सांभाळण्याचे काम बिनबोभाटपणे पार पाडीत. त्यांनी अतिशय कष्टाने व निष्ठेने उमरखेड कॅम्पमध्ये कार्य केले.गोपाळशास्त्री देवांना सत्याग्रह केल्याबद्दल साडेचार महिन्याची शिक्षा प्रथम झाली व त्यानंतर १९५२ मध्ये त्यांना १६ महिन्याची शिक्षा झाली. दोन्ही वेळा त्यांनी तुरुंगास भोगला. पती तुरूंगात असतांनाच गंगूबाईच्या वडिलांचे निधन झाले. एकटया असतांना त्या माहेरी आश्रयास गेल्या नाहीत.धीराने गोपाळशास्त्रींच्या तुरूंगाच्या काळात त्या भगवानराव गांजवे व शामराव बोधनकर यांच्या घरी राहिल्या.३० उमरी बँक लुटीनंतर उमरखेडचा कॅम्प विस्कळीत झाला. तेथून जवळ असणाऱ्या विडूळ येथे कार्यकर्ते राहू लागले. त्यावेळी गंगूबाई आपल्या मानलेल्या भावाकडे विडूळला एक महिना राहिल्या. तेथून त्या गुप्तपणे लोणी कॅम्पवर गेल्या. पण तेथे गेल्यावर त्यांच्या लक्षात आले की, येथे राहने धोक्याचे आहे. म्हणून त्यांनी सखाराम महाराजांच्या लोणीची वाट धरली व तेथे काही काळ घालविला. पुन्हा दोन महिन्यांनी उमरखेड कॅम्प सुरू झाला. कार्यकर्त्याच्या

जेवनाचे काम गंगूबाई पूर्वीप्रमाणे करू लागल्या. ते कार्य त्यांनी पोलीस ॲक्शन पर्यंत केले. मराठवाडा स्वतंत्र झाला. देव पती-पत्नी नांदेडला आले. तेथे त्यांनी रजाकारांकडून बलात्कारीत झालेल्या महिलांचे पुनर्वसन करण्याचे कार्य हाती घेतले. अनेक महिलांना त्यांनी आपल्या घरात आश्रय दिला. त्यांचे जमेल तसे विवाह लावून दिले. शिक्षीका म्हणून गंगूताईनी काही काळ सेवा केली. नांदेडच्या महिला मंडळाच्या त्या सुरूवातीपासून सभासद होत्या. मराठवाडा महिला परिषदेच्या त्या पाच वर्षे उपाध्यक्ष होत्या.

शंकुतलाबाई साले, विमलाबाई डोईफोडे, लताबाई बोधनकर, सिताबाई किवळेरक, सुलोचनाबाई बोधनकर, कावेरीबाई बोधनकर, कृष्णाबाई अंबेकर, सरस्वतीबाई देशपांडे, लक्ष्मीबाई हातारे, अन्नपूर्णाबाई दंडनाईक, रमाबाई गांजवे तान्हाबाई हंगरगेकर, अशा अनेक स्त्रियांनी नांदेड, लहान, भोकर, बारड, आष्टी येथील लढयात काम करणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना मदतीचा हात दिला. स्वातंत्र्य विरांच्या पत्नी, भगिनी, माता यांच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग मोलाचा व महत्वाचा होता. त्यांनी केलेला त्याग हैद्राबाद मुक्ती लढयाच्या इतिहासात स्वर्ण अक्षरांनी लिहून ठेवावा इतका महत्वाचा आहे.

**संदर्भ सूची**


१) घारपुरे ज्योत्सना, आशा झुंजलो आम्ही, साहित्य सेवा प्रकाशन औरंगाबाद, १९९४ पा.नं. २२

२) उपरोक्त पा.नं. २३

३) भालेराव अनंतराय है, चा मुक्ती संग्राम आणि मराठवाडा, स्वा. रा. ति.सं. संस्था,औरंगाबाद, १७ सप्टेंबर १९८७ पा.नं. ३९३

४) उपरोक्त पा. नं. ३९३

५) धारपूरे ज्योत्सना, आशा झुंजलो आम्ही, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, १७ सप्टेंबर, १९९४ पा.नं. २३

६ ) उपरोक्त पा नं. २४

७) उपरोक्त पा. नं. २३

८) भालेराव अनंतराव,- है. चा स्वा. संग्राम आणि मराठवाडा, स्वा.रा.ति.स. संस्था,औरंगाबाद, १७ सप्टेंबर १९८७ पा.नं. ३९२

९) उपरोक्त पा.नं. ३९२

१०) घारपुरे ज्योत्सना, आशा झुंजलो आम्ही, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद.१७ सप्टेंबर, १९९४ पानं. २७

११) उपरोक्त पानं. २७

१२) देव गंगूताई. -लष्कराच्या भाकरी, दै एकजूट, नांदेड, २ ऑगस्ट १९९८ पा नं. २

१३) उपरोक्त पा नं. ३०

१४) उपरोक्त पा नं ३०

१५) भालेराव अनंतराव, हैद्राबादचा स्वा संग्राम आणि मराठवाडा, स्वा.रा. ति.सं. संस्था, औरंगाबाद १७ सप्टेंबर १९८७ पा. नं. ३९२

१६) परभणी जि.स्वा.सै. समिती, हैद्राबादचा स्वा. संग्राम परभणी जिल्ह्याचे योगदान परभणी जिल्हा गौरव समिती, १९९६ मा नं. १६२

१७) घारपुरे ज्योत्सना, आशा झुंजले आम्ही, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद,१७ सप्टेंबर १९९४ पा.नं. १३०

१८) काळे भगवान, मुक्ति संग्रामातील धगधगत्या अग्निशिखा, दै. मराठवाडा,१७ सप्टेंबर १९९८ औरंगाबाद

१९) उपरोक्त पा नं. १३२

२०) परभणी जिल्हा गौरव समिती, हैद्राबाद संग्राम, परभणी जिल्हयाचे योगदान,जि. गौरव समिती, १९९६ पानं. १६३

२१) धारपूरे ज्योत्सना, आशा झुंजलो आम्ही, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद,१७ सप्टेंबर, १९९४ पानं. १३०

२२) सौ. देव, लष्कराच्या भाकरी, दै. प्रजावाणी- १९९८ नांदेड पा.नं. २ -

२३) धारपूरे ज्योत्सना, आशा जल आम्ही साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद,१७ सप्टेंबर, १९९४ पानं. १४०

२४) परांजपे तारा, संग्रामातील शूर महिला, दै मराठवाडा, दिवाळी विशेषांक,१२७२पा.नं.७५

२५) भालेराव अनंतराव हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील शूर वीर महिला दै मराठवाडा,१७ सप्टेंबर १९९५
२६) परांजपे तारा, संग्रामातील शूर वीर महिला, मराठवाडा स्वातंत्र्य महोत्सव विशेषांक १७ सप्टेंबर १९९८ पा.नं. ७६
२७) धारपूरे ज्योत्सना, आशा झुंजलो आम्ही, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, १७ सप्टेंबर १९९४ पानं. १९७
२८) उपरोक्त पा नं. १९७
२९) परांजपे तारा, संग्रामातील शूर वीर महिला, मराठवाडा स्वा महोत्सवी विशेषांक३०२१७ सप्टेंबर १९९८ पा.नं. ७७
३०) धारपुरे ज्योत्सना, आशा झुंजले आम्ही, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद,१७ सप्टेंबर १९९४ पा नं. २००